दिनांक :     .०१.२०१९

प्रति,

मा. गृहमंत्री,
भारत सरकार, नवी देहली ११००११.

**विषय : भगवान हनुमानाला मुसलमान, जाट, चिनी, खेळाडू आदी म्हणणाऱ्यांवर कारवाई करण्याविषयी, तसेच देवतांचा अनादर रोखण्यासाठी कठोर कायदा करण्याविषयी**

महोदय,

गेल्या महिन्यात कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या साक्षात भगवान शिवाचे अवतार असलेल्या आणि भक्तीचे अत्युच्च प्रतिक असलेल्या श्रीरामभक्त हनुमानाला विविध जात-पात-धर्म आदींची विशेषणे देण्याची अन् जातींमध्ये विभागण्याची जणू चढाओढच लागली आहे. भगवान हनुमान यांना कोणी मुसलमान, कोणी जाट, कोणी चिनी, कोणी खेळाडू, तर कोणी वैश्य आदी म्हणत अवमानास्पद विधाने करत देवतांचा अनादरच चालवला आहे. हिंदूंच्या देवतांचा अशाप्रकारे राजकारणासाठी उपयोग करणे, हे अत्यंत चुकीचे असून अशी विधाने करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. कायद्याचा धाक नसल्याने अनेक जण अशी विधाने करू धजावतात.

*** तरी या संदर्भात गेल्या काही दिवसांत झालेली वक्तव्ये पुढे देत आहोत –**

१. भाजपचे मुसलमान नेते बुक्कल यांनी, ‘हनुमान हा मुसलमान होता. त्यामुळे मुसलमानांमध्ये मुलांना रहमान, रमजान, फर्मान, झिशान, कुर्बान यांसारखी नावे ठेवली जातात’, असे वक्तव्य केले.

२. उत्तरप्रदेश येथील खासदार सावित्रीबाई फुले यांनी, ‘राम हे मनुवादी होते आणि हनुमान हे मनुवादी लोकांचे गुलाम होते. हनुमान जर दलित नव्हते, तर त्यांना मनुष्य का बनवले नाही ? त्यांना वानरच का बनवले ? त्यांचा चेहरा काळा का ठेवला ? ते दलित होते म्हणून असे केले. हनुमान एक मनुष्य होते; पण त्यांना वानर बनवण्यात आले. हे सर्व भगवान रामांनी केले’, असे वक्तव्य केले.

३. जैन मुनी निर्भय सागर महाराज यांनी ‘हनुमान हा जैन होता आणि ते जैनांमधील १६९ लोकांपैकी एक होते’, असे विधान केले.

४. माजी खासदार आणि राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार साय यांनी हनुमान ‘अनुसूचित जनजाती’चे होते, असे म्हटले.

५. विद्यमान केंद्रीय मंत्री श्री. सत्यपाल सिंह यांनी हनुमान ‘आर्य’ होते, असे म्हटले आहे.

६. अलवर, राजस्थानचे आमदार श्री. ज्ञानदेव आहुजा यांनी हनुमानाला ‘घोटेवाला सांड’ असे संबोधले.

७. भाजपचे खासदार हरि ओम पांडे यांनी ‘हनुमान ब्राह्मण होते आणि जटायू मुसलमान होता’ असे विधान केले.

८. भाजप खासदार उदित राज यांनी प्रथम म्हटले की, वैज्ञानिक आणि पुरातत्त्वीय दृष्टीकोनातून पाहता हनुमानाचे काही अस्तित्व नव्हते. याविषयी आणखी दृष्टीकोन सांगतांना ते म्हणाले की, ते जंगलात रहात होता, यानुसार ते आदिवासी होते.

९. समाजवादी पक्षाचे आमदार शतरुद्र यांनी ‘वनवासी’ आणि ‘गिरीवासी’ होते, असे म्हटले.

१०. उत्तर प्रदेश धर्मार्थ कार्य आणि संस्कृती मंत्री चौधरी लक्ष्मीनारायण सिंह यांनी हनुमान ‘जाट’ होते, असे म्हटले.

११. माजी क्रिकेटपटू आणि भाजप खासदार कीर्ती आझाद यांनी तर हनुमान हे चीन येथून आले होते, म्हणून ते ‘चिनी’ असल्याचे अकलेचे तारे तोडले.

१२. उत्तर प्रदेशाचे क्रीडा आणि युवा मंत्री श्री. चेतन चौहान यांनी त्यापुढे जाऊन हनुमान हे कुस्ती खेळायचे, ते खेळाडू होते, असे म्हटले.

ही यादी अजूनही वाढेल, इतकी वक्तव्ये अनेकांनी भगवान हनुमानाविषयी केली आहेत. ही दुःस्थिती हिंदू

नेत्यांचे हिंदु धर्माविषयी असलेले अज्ञान दर्शवते; मात्र अशी विधाने करणे हा भगवान हनुमानाचा घोर अपमान आहे. हनुमानाचा असा अनादर करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई होणे गरजेचे आहे. समाजातील जबाबदार व्यक्तींना जर देवतांविषयी अशी बेजबाबदार विधाने केली, तर त्याचा समाजमनावर काय परिणाम होईल, याचाही विचार ही मंडळी करत नाहीत. या प्रकरणी अयोध्या येथील हनुमानगढी मंदिराचे महंत राजू दास यांनी 'यापुढे जर कोणी हनुमानाच्या संदर्भात अशी विधाने केली, तर त्यांच्यावर खटला प्रविष्ट करण्यात येईल', अशी चेतावणी दिली आहे. हिंदूंच्या संत-महंतांना असे सांगण्याची वेळ या नेत्यांनी आणली आहे. देवतांचा अनादर करणे, हे महापाप आहे. यातून धर्माची हानी होते आणि ही धर्महानी रोखणे, हे हिंदूंचे कर्तव्यच आहे.

यापूर्वीही 'ओ माय गॉड', 'पीके' आदी अनेक चित्रपटांत देवतांचे विडंबन करण्यात आले, त्याविरोधात अनेक ठिकाणी आंदोलने झाली, तक्रारी दाखल करण्यात आल्या, तरी त्या चित्रपटावर वा अन्य कोणावरही कोणतीही कारवाई झाली नाही. हिंदुद्रोही चित्रकार म.फि. हुसेनसारख्या अनेक चित्रकारांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली देवतांची अनेक अश्लील अन् आक्षेपार्ह चित्रे रेखाटली, अनेक देवी-देवतांना नग्न रूपात चितारले, भारतमातेचेही नग्नचित्र रेखाटले; त्यांच्यावर १२०० हून अधिक तक्रारी करण्यात आल्या; पण त्यांच्यावरही कोणतीही कारवाई झाली नव्हती. याच प्रकारे विज्ञापनांच्या माध्यमातूनही देवतांचे सर्रास विडंबन केले जाते. अशा घटना हिंदूंच्या मनात असंतोष वाढण्यास कारणीभूत ठरत आहे.

भाषणस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, कलास्वातंत्र्य आदींच्या नावाखाली हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावण्याचे प्रकार जाणीवपूर्वक केले जात आहेत. अशा प्रकारच्या कृत्यांवर कायद्याने कोणताही वचक नसल्याने या लोकांचे फावते. विद्यमान भारतीय दंड संहितेत 'कलम २९५ अ' हे धार्मिक भावना दुखावण्याच्या संदर्भातील कलम अस्तित्वात आहे; मात्र या कलमामध्ये उपरोक्त कृतींच्या संदर्भात तपशील दिलेला नाही. त्यामुळे बहुतांशप्रसंगी देवतांच्या विडंबनाच्या घटनांमध्ये कायदेशीर कारवाई केली जात नाही.

**※ तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत –**

१. हनुमानाला मुसलमान, जाट, चिनी, खेळाडू आदी म्हणणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून अशा प्रकारे अन्य देवतांच्या बाबतीतही कोणी बोलू धजावणार नाही.

२. या संदर्भात सध्याचे कायदे पुरेसे नसून केंद्र शासनाने भाषणे, नाटके, चित्रपट, विज्ञापने, काव्ये, चित्रे, सामाजिक माध्यमे आदींद्वारे हिंदु धर्म, धर्मग्रंथ, देवता आणि संत यांचे होणारे विडंबन अन् अवमान रोखण्यासाठी लवकरात लवकर नव्याने कठोर बनवावा आणि त्याची तत्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

आपला विश्वासू,

(संपर्क :                    )

प्रत : मा. कायदामंत्री, भारत सरकार, नवी देहली.